**अधीक्षक अभियंता व सहसंचालक**
**महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी**
**जलसंपदा विभाग, दिंडोरी मार्ग, नाशिक - ४२२ ००४**

**संपर्क**:- **व्या. परीक्षा -०२५३-२५३ २८७९** **ई-मेल** :- pemetansk@gmail.com

**जा. क्र.** मअप्रप्र/व्या.परीक्षा/(नस्ती क्र.-०३/२०२४)/ **९९** /२०२४ **दि. ०६/०९/२०२४**

# परिपत्रक

**विषय**:- सहाय्यक अभियंता श्रेणी २/ सहाय्यक अभियंता (राजपत्रित) स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) व कनिष्ठ अभियंता (अराजपत्रित) (स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) गट ब संवर्ग व्यावसायिक परीक्षा दि. २ व ३ सप्टेंबर २०२४.
**(व्यावसायीक परीक्षा प्रश्नपत्रिकांची Ansner Key प्रसिध्द करुन प्रश्नांविषयी परीक्षार्थीचे आक्षेप मागविणे बाबत).**

**संदर्भ**:- या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. ७५ दि. ३१/०७/२०२४

संदर्भिय परिपत्रकाद्वारे जाहीर करण्यात आलेली, सहाय्यक अभियंता श्रेणी-२ व कनिष्ठ अभियंता (गट-ब संवर्ग) यांची व्यावसायीक परीक्षा, दि. ०२ व ०३ सप्टेंबर २०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली आहे.

सदर परीक्षेमधील प्रत्येक परीक्षार्थीच्या उत्तरपत्रिका त्यांच्या लॉगईन मध्ये अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

***या परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात येते की, उपलब्ध करुन दिलेल्या उत्तरपत्रिका हा परीक्षेचा निकाल नसून केवळ परीक्षार्थीच्या अवलोकनार्थ व प्रश्नाविषयी आक्षेप नोंदविणेसाठी आहेत. तरी कृपया या माहितीच्या आधारे सेवापुस्तकात किंवा इतरत्र परीक्षेविषयीची कुठलीही नोंद घेऊ नये.***

प्रत्येक परीक्षार्थीने आपापल्या उत्तरपत्रिका तपासून पहाव्यात व जर काही प्रश्न व त्यांच्या योग्य उत्तरांबाबत शंका असल्यास खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१) परीक्षार्थीनी खालील लिंक वर लॉगईन करावे.
https://cdn.digialm.com/EForms/configuredHtml/31578/88236/login.html

२) परीक्षार्थीना लॉगईन केल्यावर त्यांनी दिलेल्या विषयांचे टॅब वर क्लिक करुन संबंधीत विषयाची उत्तरपत्रिका पहावी.

३) ज्या प्रश्नांबाबत व त्यांच्या उत्तरांबाबत शंका असेल त्या प्रश्नांचा “Question ID” लिहून घ्यावा.

४) परीक्षार्थीनी उपरोक्त “Question ID” खाली दिलेल्या **गुगल फॉर्ममध्ये** आवश्यक सर्व माहिती भरुन या कार्यालयास केवळ ऑनलाईन पध्दतीनेच **दि. ११/०९/२०२४ बुधवार** पर्यंत सादर करावे. याबाबत ई-मेल अथवा इतर मार्गाने पाठविलेले अथवा विहित मुदतीनंतरचे आक्षेप विचारात घेतले जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**गुगल फॉर्मची लिंक** - https://forms.gle/uvr17nDEs7Ec2Vr86

परीक्षेचा निकाल जाहिर करणेपुर्वी खालील बाबींची तपासणी आवश्यक आहे,

१) विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या सर्व आक्षेपांबाबत आवश्यक पडताळणी

२) प्रवेश अर्जासोबत सादर केलेले नियंत्रक अधिका-यांचे प्रमाणपत्र

३) मागील संधीतील गुणांनुसार प्राप्त झालेली विषयातील सुट

४) परीक्षे विषयींच्या इतर आवश्यक बाबी

५) परीक्षेसंबंधातील मा. न्यायालय व मा. न्यायाधिकरण यांचेकडील प्रकरणांमधील आदेश, सादर केलेले प्रबोधिनीचे शथपपत्र (Say) इ.

परीक्षेबाबत व परीक्षार्थींच्या उपरोक्त बाबींची तपासणी झाल्यानंतर सदर परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**(प्र. मो. बावीस्कर)**
अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक

प्रत- मास्टर फाईल २०२४